भारती जाधव, वाकोला.

☐ राजा गोसावी व शरद तळवलकर या जोडीने एकत्र भूमिका केलेले चित्रपट कोणते? नायिका कोण?

— *अखेर जमलं*(बेबी शकुंतला), *दोन घडीचा डाव*(कामिनी कदम-स्मिता), *याला जीवन ऐसे नाव*(जयश्री गडकर-नलिनी चोणकर), *अवघाची संसार*(जयश्री गडकर-नयना), *संगत जडली तुझी अन् माझी*(जीवनकला-नीलम), *आधी कळस मग पाया*(सीमा), *बाप माझा ब्रह्मचारी*(जयश्री गडकर),*प्रीती विवाह*(जयश्री गडकर), *वरदक्षिणा*(सीमा), *वाट चुकलेले नवरे*(कामिनी कदम-ललिता देसाई-आशू), *कामापुरता मामा*(सुजाता-ललिता देसाई-आशू), *सुधारलेल्या बायका*(कामिनी कदम), *अति शहाणा त्याचा*(रत्ना, ललिता देसाई), *शेरास सव्वाशेर*(कामिनी कदम, जीवनकला), *श्रीमंत मेहुणा पाहिजे*(जयश्री गडकर) या चित्रपटात. इतर काही चित्रपटातही ते एकत्र आले. पण येथे जोडी म्हणून ज्या चित्रपटात ते एकत्र आले अशा चित्रपटांचाच फक्त विचार केलाय.

☐ महेश कोठारेने कोणकोणत्या हिंदी चित्रपटात बालकलाकार म्हणून काम केलं?

— *छोटा भाई, मेरे लाल, राजा और रंक, घर घर की कहानी, सफर, उपकार.*

भरत चंद्रकांत कालुवाला, महीम.

☐ 'याद रहेगा प्यार का ये रंगीन जमाना...'(मुकेश), 'गुलमोहर अगर तुम्हारा नाम होता...'(किशोर) व 'ये दुनिया के बदलते रिश्ते...'(किशोर) ही गाणी कोणत्या चित्रपटातील? कलाकार, संगीतकार, निर्माता, दिग्दर्शक कोण?

— पहिले गाणे १९७५च्या *उमरकैद* या चित्रपटातील. कलाकार सुनील दत्त, जितेंद्र, रीना रॉय, विनोद मेहरा, मौसमी चॅटर्जी, ओम शिवपुरी, कादर खान, अंजू महेंद्र, देवकुमार, कृष्ण धवन, निर्माता सी. के. सोबती, दिग्दर्शक सिकंदर खन्ना, संगीत सोनिक ओमी, दुसरे गाणे १९७८च्या *देवता*मधील कलाकार संजीवकुमार, शबाना आझमी, डॅनी डेंझोपा बेंजामिन गिलानी, राकेश रोशन, सारीका, केश्तो मुखर्जी, निर्माता एन. एन. सिप्पी, दिग्दर्शक एस. रामानाथन, संगीत आर. डी. बर्मन.

चौथे गाणे १९७८च्या *बदलते रिश्ते* या चित्रपटातील. पण हे गाणे किशोरकुमारने एकट्याने गायले नव्हते. त्याच्याबरोबर रफी व सुमन कल्याणपूर यांचा आवाज देखील या गाण्यात होता. कलाकार जितेंद्र, ऋषी कपूर, रीना रॉय, असरानी, शुभा खोटे, ए. के. हंगल, निर्माता सुदेशकुमार, रघुनाथ झालानी, संगीत लक्ष्मीकांत प्यारेलाल.

अतुल वारे, जानेगाव.

☐ महाराष्ट्रीय संगीतकार स्वर्गीय अरुण पौडवाल यांनी संगीतबद्ध केलेले हिंदी चित्रपट कोणकोणते?

— *मीरा का मोहन, शिव महिमा, आजा सनम.*

दशरथ धनावडे, नाणार, रत्नागिरी.

☐ विनोद मेहराचे हिट चित्रपट कोणते?



घरमध्ये विनोद मेहरा - रेखा

— *साजन की सहेली, घर, दो फूल, अनुराग, लाल पत्थर, अमर प्रेम, जानी दुश्मन* आणि *आखिर क्यों?* हे विनोद मेहराचे हिट चित्रपट ठरले.

सुषमा कातकर, बोरिवली.

☐ शबाना आझमीला आजवर कोणकोणत्या चित्रपटांसाठी पुरस्कार मिळाले?

— *अंकूर, अर्थ, खंडहर, पार, गॉडमदर*साठी शबानाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाले तर *स्वामी, अर्थ* आणि *भावना*साठी फिल्मफेअर पुरस्कार मिळाले आहेत.

☐ मनोजकुमारचा पहिला चित्रपट कोणता?

— *फॅशन* या चित्रपटात मनोजकुमारने भिकाऱ्याची छोटीशी भूमिका केली होती. नायकाची भूमिका असलेला त्याचा पहिला चित्रपट होता *काच की गुडिया.*

ज्ञानेश्वर महाडीक, ...

☐ एक अक्षरी चित्रपट कोणते आहेत?

— माँ आणि स्त्री. यातला *माँ* नावाचा चित्रपट चार वेळा आला. १९३६, १९५२, १९७६ आणि चौथा १९९१ला पडद्यावर झळकला. *स्त्री* नावाचा चित्रपट १९१८ आणि १९६१ असा दोन वेळा आला.

☐ 'जाने बहार हुस्न तेरा बेमिसाल है...' हे गाणं कोणत्या चित्रपटातलं आहे?

— १९६३च्या *प्यार किया तो डरना क्या*मधलं हे गाणं आहे.

संतोष हलकुडे, कुर्डुवाडी.

☐ जितेंद्रने सर्वाधिक चित्रपट कोणत्या अभिनेत्रीबरोबर केले?

— रेखाबरोबर. *एक बेचारा, अनोखी अदा, दिलदार, अपना बना लो, एक ही भूल, जुदाई, मेहंदी रंग लायेगी, नियत, एक ही रास्ता, जलमहल, मांग भरो सजना, निशान, प्रेम तपस्या, रास्ते प्यार के, जाल, सदा सुहागन, लॉकेट, अपने अपने, अमीर गरीब, मेरा पती सिर्फ मेरा है, शेषनाग, सौतन की बेटी, इन्साफ की देवी, गीतांजली* या चोवीस चित्रपटांत जितेंद्र रेखाबरोबर नायकाच्या भूमिकेत चमकला.

☐ डॅनीने कोणकोणत्या चित्रपटांत गाणी गायली? त्याने कधी चित्रपटनिर्मिती केली आहे का? त्या चित्रपटाचे नाव काय? कलाकार कोण?

— *ये गुलिस्ताँ हमारा, काला सोना* या चित्रपटात डॅनीने गाणी गायली. त्याने स्वतः कधी चित्रपट निर्माण केलेला नाही. *फिर वही रात* या चित्रपटाचं दिग्दर्शन त्याने केलं होतं. तो स्वतः व राजेश खन्ना, किम, ओम शिवपुरी, ए. के. हंगल, जगदीप, मुकरी व शशीकला यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका होत्या.

सुधाकर परुळेकर, पुणे.

☐ सचिन पिळगावकरच्या एका मराठी चित्रपटात नायिकेची भूमिका करणारी अभिनेत्री राजेश्वरी व *आँखे*त गोविंदाबरोबर नायिकेची भूमिका करणारी राजेश्वरी एकच का?

— नाही. राजेश्वरी *आयत्या घरात घरोबा* या चित्रपटात सचिनबरोबर होती. *आँखे*तील गोविंदाच्या नायिकेचे नाव राजेश्वरी नाही रागेश्वरी आहे.